सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# सहसंचालक तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर अमरावती**

Email:- roamravati@dtemaharashtra.gov.in
Phone:- 0721-2573027, 2572577
internet-http://www.jdroamt.org
Fax No.-0721-2661453

**महत्वाचे**

क्रमांक : विकाअ/लेखा/वृक्ष लागवड/२०२१-२२/ 810
दिनांक : 05 JUL 2021

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ
शासकीय तंत्रनिकेतन,
अमरावती/अचलपुर/मुर्तिजापूर/खामगाव/वाशिम/यवतमाळ (नवीन)
सर्व,
विना अनुदानित पदवी/पदविका
पदव्युत्तर पदवी संस्था

**विषय :-** वृक्षारोपन व वृक्ष संवर्धन करण्याबाबत.

**संदर्भ :-** मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र. कक्ष-२३/रोहयो/काव्य/कावि-४४/२०२१ दि. ०७.०६.२०२१

उपरोक्त संदर्भांकीत पत्राचे कृपया अवलोकन करावे, त्यास अनुसरून कळविण्यात येते की, मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देवून आपले संस्थास्तरावर वृक्ष लागवड व संगोपन करून भरपूर प्रमाणात वृक्ष लागवड होवून त्याचे संगोपन होईल याची दक्षता घ्यावी. या संदर्भात कळविण्यात येते की, संस्थास्तरावर स्वयंस्फुर्तीने वृक्षलागवड करून केल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. आर. पी. मोगरे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती.

प्रत : मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना माहीतीकरीता मानार्थ सादर.

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय,
कॅम्प रोड-अमरावती ४४४ ६०२

दुरध्वनी क्र. ०७२१-२६६२५०५ email- dycollegs.amt@gmail.com

क्र.कक्ष-२३/रोहयो/काव्य/कावि- ४४/२०२१ दिनांक :- ०७/०६/२०२१

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती

२) कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

३) कार्यालय प्रमुख, सहसंचालक (तंत्रशिक्षण)
शासकीय/ निमशासकीय कार्यालय,
सहसंचालक (तंत्रशिक्षण) (कार्यालयाचे नाव) यांचे कार्यालय अमरावती.

४) धर्मदाय आयुक्त, अमरावती

५) जिल्हा कृषि अधिकारी, अमरावती

विषयः- वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन करण्याबाबत.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने, वैश्विक तापमान वाढ व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शासनाकडून सामाजिक वनिकरण विभागातर्फे वृक्ष लागवड संगोपन केले जाते. सामाजिक वनीकरण विभागाकडून वृक्षलागवड दरवर्षी करण्यात येते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीची गरज असल्याचे दिसुन येते. पर्यावरणाचा समतोल राखलाजावा यासाठी मोठ्याप्रमाणावर वृक्ष लागवड करुन वृक्षांचे संगोपन व संवर्धन करणे आवश्यक आहे. वृक्षलागवड संगोपन व संरक्षण हे मोठ्या प्रमाणात करण्यासाठी लोकसहभाग असणेही तितकेच महत्वाचे आहे. रोडच्या दुतर्फा, महाविद्यालय, विद्यालय व शाळांच्या परिसरात धार्मिक ठिकाणी मंदिरांच्या परिसरात शेतांच्या बांध्यावर व शेताच्या ठिकाणी वृक्ष लागवड / वृक्षारोपन करणे अत्यंत आवश्यक आहे. वृक्षांचे संगोपन व संरक्षण करणेही आवश्यक आहे. त्यासाठी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी , महाविद्यालय, विद्यालय, शाळांमधील प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपन करुन वृक्षसंवर्धनाची व संरक्षण करण्याची जबाबदारी स्विकारुन मोठ्या प्रमाणावर वृक्ष जगवावेत. तसेच धार्मिक स्थळी, मंदिर व मसजीद च्या परिसरात ट्रस्टींनी वृक्षरोपन करुन वृक्षसंवर्धनाची व संरक्षणाची जबाबदारी स्विकारुन मोठ्या प्रमाणावर वृक्ष जगवावेत. शेतात व शेताच्या बांधावर शेतकरी यांनीसुध्दा मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी, वृक्षांचे संवर्धन व संरक्षण करुन वृक्ष जगवावेत. सद्याचे वातावरणाचा विचार करुन व सामाजिक बांधिलकी म्हणून पर्यावारणाचा समतोल राखण्यासाठी सर्व स्तरांवरुन वृक्षरोपन करणे, वृक्षसंवर्धन व संरक्षण करणे काळाची गरज आहे. त्यासाठी सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी महाविद्यालय, विद्यालय, शाळांमधील प्राचार्य मुख्याध्यापक, शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वृक्ष लागवण्याची व वृक्ष संवर्धनाची/संरक्षणाची जबाबदारी सोपवून मोठ्या प्रमाणावर वृक्ष जगविण्याचे उद्दीष्ट गाठावे व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सहकार्य करावे. अशा सूचना आपण आपल्या स्तरावरुन द्याव्यात.